



दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १२६ । किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । २६/०५/२०२६ । पाने -६




# तामिळनाडू राज्यात संगमनेरच्या आयपीएस अधिकाऱ्याची चर्चा

## प्रवीण डोंगरे यांच्यावर मोठी जबाबदारी





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेक -तामिळनाडूतील आगामी पोटनिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री विजय थलापती यांनी प्रशासकीय पातळीवर महत्त्वाच्या हालचाली सुरू केल्या असून, त्यात अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरचे आयपीएस अधिकारी प्रवीण डोंगरे यांची नियुक्ती चर्चेचा विषय ठरली आहे. कर्तव्यदक्ष आणि कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळख असलेल्या डोंगरे यांना बढती देत पोलिस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे ज्या मतदारसंघातून स्वतः विजय निवडून आले होते, त्या त्रिची ईस्ट विधानसभा मतदारसंघात लवकरच पोटनिवडणूक होणार आहे. विजय यांनी आमदारकीचा राजीनामा दिल्यामुळे ही जागा रिक्त झाली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणुकीपूर्वी प्रवीण डोंगरे यांच्याकडे महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आल्याने राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

प्रवीण डोंगरे हे २०१६ बॅचचे आयपीएस अधिकारी असून ते मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील आहेत. संगमनेरमध्ये त्यांचे घर असून त्यांचे प्राथमिक शिक्षणही तेथेच झाले. त्यांनी पेट्रोकेमिकल अभियांत्रिकीमध्ये बीई पदवी प्राप्त केली आहे. त्यांचे वडील गट शिक्षणाधिकारी होते, तर त्यांचे एक भाऊ न्यायाधीश आहेत. सामाजिक भान जपत त्यांनी आदिवासी मुलांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्रही सुरू केले होते.

यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर डिसेंबर २०१६ मध्ये त्यांनी नागरी सेवेत प्रवेश केला. कारकिर्दीची सुरुवात तिरुवेरुंबूर येथे सहाय्यक पोलिस अधीक्षक म्हणून केली. (पान ४ वर)

# शिक्षण प्रसारक संस्थेवर मालपाणी पॅनलचे वर्चस्व

## ॲड. संग्राम जोंधळेंची एकाकी लढत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील नामांकित शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे कार्याध्यक्ष संजय मालपाणी यांच्या नेतृत्वाखालील अधिकृत पॅनलने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध करत दणदणीत विजय मिळवला. मात्र, ही निवडणूक बिनविरोध होण्याचा अंदाज फोल ठरवत एकमेव उमेदवार म्हणून मैदानात उतरलेल्या ॲड. संग्राम जोंधळे यांनी संपूर्ण सत्ताधारी पॅनलला जोरदार टक्कर देत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

संस्थेच्या संचालक मंडळाच्या जागांसाठी एकूण ३१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. त्यापैकी ३० उमेदवार हे संजय मालपाणी यांच्या नेतृत्वाखालील अधिकृत पॅनलचे होते, तर ॲड. संग्राम जोंधळे हे एकमेव स्वतंत्र उमेदवार म्हणून मैदानात उतरले होते. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न झाले असल्याची चर्चा होती; मात्र ॲड. जोंधळे यांनी उमेदवारी कायम ठेवत निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आणि त्यामुळे मतदान प्रक्रिया पार पडली.

मतदानाच्या दिवशी एकूण ५१९ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. संपूर्ण बलाढ्य पॅनल आणि त्यांच्या यंत्रणेच्या विरोधात एकट्याने मैदानात उतरलेल्या ॲड. जोंधळे यांनी ११२ मते मिळवत सत्ताधाऱ्यांसमोर एक मोठे आव्हान उभे केले. निकालात त्यांचा पराभव झाला असला, तरी मिळालेली मतसंख्या सध्या संगमनेरच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. (पान ३ वर)

### निवडून आलेल्या उमेदवारांना मिळालेली मते

आट्टल ओंकार रामदयाळ (४८५), करवा संतोष मोहनलाल (४७२), कालडा गिरिश राधाकिसन (४६५), कासट अरविंद गंगाबिसन (४८२), चोथवे संदिप दत्तात्रय (४५३), चांडक नरेंद्र, बद्रिनारायण (४८६), जाजु दिपक श्रीनिवास (४४९), डंग जसपाल सिताराम (४७९), डंग महेश बिहारीलाल (४८३), ताजणे अरुण लहाणू (४७२), थोरात किसन केशवराव (४५०), देशमाने बाळासाहेब भास्करराव (४५५), नावंदर मधुसुदन सुभाषचंद्र (४६४), नावंदर श्रीहरी अरुणकुमार (४५९), पलोड सचिन लक्ष्मीनारायण (४६७), पवार रवींद्र रत्नाकर (४७०), पारख नंदलाल बन्सीलाल (४६५), पंडीत सात्विक अमित (४६८), बाफणा ऋषीकेश नंदनमल (४६२), भुतडा ॲड. राजेश जगदीश (४८३), मणियार अनिश कमलकिशोर (४६२), मालपाणी संजय ओंकारनाथ (४९०), राठी अनिल पन्नालाल (४८०), राठी केदारनाथ चंपालाल (४७५), लड्डा डॉ. राजेंद्र शंकरलाल (४७४), लाहोटी गणेश शिवप्रसाद (४८४), शाह आशिष अरविंद (४६३), सराफ डॉ. पराग प्रकाश (४७३), सातपुते अनिल जगन्नाथ (४७९), सोमाणी कैलास श्रीनिवास (४८२).




# "कॉकरोच" विरोधात याचिका

## लगेच भावनिक होऊ नका, सर्वोच्च न्यायालय

मुंबई (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी कॉकरोच जनता पार्टीशी संबंधित व्यक्तींच्या हालचालींची सीबीआय चौकशी करण्याच्या मागणीवर तात्काळ सुनावणी करण्यास नकार दिला.

कॉकरोच जनता पार्टी हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे, जे भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील कॉकरोच टिप्पणीनंतर समोर आले. सोमवारी दुपारी १२ वाजेपर्यंत सीजेपीच्या इंस्टाग्रामवर २.२९ कोटी फॉलोअर्स झाले आहेत.

न्यायालयात याचिकाकर्त्यांचे वकील एनके गोस्वामी यांनी सांगितले की, सीजेपी न्यायव्यवस्थेची प्रतिमा मलिन करत आहे. यानंतर सरन्यायाधीश आणि न्यायमूर्ती जॉयमाल्यस बागची आणि व्हीएम पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले, 'याला इतक्या भावनिकतेने घेऊ नका.'

ही याचिका ॲडव्होकेट राजा चौधरी यांनी दाखल केली आहे. त्यांनी आंदोलनाशी संबंधित व्यक्तींच्या बनावट वकिलांची आणि बनावट कायद्याच्या पदव्यांची चौकशी करण्याचीही मागणी केली आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर अलीकडील कार्यवाहीदरम्यान दिलेल्या तोंडी न्यायालयीन विधानांचे व्यावसायिकीकरण करण्याविरोधात कारवाई करण्याचीही मागणी केली आहे.

यावर सीजेआय यांनी उत्तर दिले की, सध्या अशी कोणतीही गंभीर आणीबाणीची परिस्थिती नाही. काय होते ते पाहू. तर, महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील सीजेपी संस्थापक अभिजीत दीपके यांच्या घरावर २४ तास पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी सांगितले की, ही तैनाती खबरदारीचा उपाय म्हणून करण्यात आली आहे.

त्यांनी सांगितले की, सोशल मीडियावर उगझ चा मुद्दा ट्रेंड करत आहे, त्यामुळे त्यांच्या घराबाहेर गर्दी जमू नये, हे लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले. मात्र, त्यांना कोणत्याही प्रकारची अधिकृत धमकी मिळाल्याचे त्यांनी नाकारले.

अभिजीत यांनी रविवारी सांगितले होते की, त्यांच्या पक्षाची वेबसाइट बंद करण्यात आली आहे. दीपके यांनी द वर म्हटले होते - सरकारने आमची वेबसाइट बंद केली आहे. त्यावर १० लाख लोकांनी नोंदणी केली होती. ६ लाख लोकांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर स्वाक्षऱ्या केल्या होत्या.









# कै. सुधाकर भालेराव सर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## प्रेम, माणुसकी आणि संस्कारांचा दीप विझला



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

हे सर्व लिहिताना डोळे पाणावले आहेत, हात थरथरत आहेत आणि काकांच्या असंख्य आठवणी मनात ठाण मांडून बसल्या आहेत.

रविवार, दिनांक १७ मे २०२६ हा दिवस आयुष्यभर विसरणे शक्य होणार नाही. सकाळची वेळ होती. मु.पो. निमोण, ता. संगमनेर येथे घरी असताना अचानक मोठी बहिण संगीताताई हिचा फोन आला. काही विशेष काम असल्याशिवाय एवढया सकाळी फोन आला त्यामुळे काळजी वाढली. तिच्या आवाजातील कंप आणि वेदना मनाला अस्वस्थ करून गेली. पुढच्याच क्षणी तिने दिलेली बातमी काळजाला चिरून गेली, आमचे लाडके काका भालेराव सर यांचा अपघात झाला आहे आणि त्यात ते...पण तिला सविस्तर माहित नव्हते लगेच याची खातरजमा कर. क्षणभर सगळं काही थांबल्यासारखं वाटलं. मनाने ही गोष्ट स्वीकारण्यास नकार दिला. कारण काका म्हणजे केवळ एक व्यक्ती नव्हते; ते अनेकांच्या आयुष्यातील आधारवड होते. खात्री करण्यासाठी त्यांचे जावई आणि माझे स्नेही डॉ. सचिन भोसले यांना फोन केला आणि त्यांनी बातमी खरी असल्याचे सांगताच काळजाचा ठोका चुकला. आयुष्यभर कधीच कुणाला न रागवणारे काका आज मात्र सगळ्यांचा रोष घेऊन गेले.

अवघ्या दीड महिन्यापूर्वी, ५ एप्रिल २०२६ रोजी माझ्या निमोण येथे बांधलेल्या नवीन घराच्या गृहप्रवेशाच्या कार्यक्रमात काका मोठया आनंदाने सहभागी झाले होते. घर पाहून काका आणि मावशी दोघांना ही खूप बरे वाटले, त्यांनी माझ्या दिवंगत आई-वडिलांचे, माझे, बहिणीचे आणि पत्नी डॉ. कल्पनाचे आपल्या भाषणात तोंडभरून कौतुक केले होते. त्यांच्या डोळ्यांतला आनंद आणि शब्दांतील आपुलकी अजूनही कानात घुमत आहे. तो क्षण आम्ही चित्रित करून ठेवला आहे. कोणाचंही चांगलं झालं की मनापासून आनंद मानणारा माणूस आज अचानक निघून गेला, ही भावना असह्य आहे. त्यांना माझे आणि माझ्या पत्नीच्या शिक्षणाचा आणि कामाचा खूप अभिमान कौतुक होते, माझे अक्षर खूप सुंदर आहे, मी पुस्तके लिहितो यावर ते भरभरून बोलायचे, जेव्हा-जेव्हा त्याच्या संगमनेरच्या बंगल्यावर जाणे व्हायचे, त्यावेळी आपुलकीने चौकशी करणे, चहा-नाश्ता, जेवण हे नित्याचेच होते.

भालेराव काका आयुष्यभर शिक्षक म्हणून जगले; पण ते फक्त विद्यार्थ्यांचे शिक्षक नव्हते, तर समाजाला माणुसकीचे धडे देणारे एक जिवंत विद्यापीठ होते. रयत शिक्षण संस्थेच्या चिंचोली गुरव येथील माध्यमिक शाळेत त्यांच्या नोकरीचा बराच कालावधी गेला. त्याठिकाणी अनेक गावकरी, शेजारी यांच्याशी त्यांचे कायमचे ऋणानुबंध जुळले. माझ्या आतापर्यंतच्या वाटचालीत मग ती शैक्षणिक, कौटुंबिक असो व इतर त्यांचा सल्ला आणि मार्गदर्शन हे कायम अमुल्य राहिले. अत्यंत शांत स्वभाव, मितभाषी वृत्ती, निर्व्यसनी, साधे जीवन आणि प्रत्येकाशी आदराने वागण्याची त्यांची पद्धत मन जिंकून घ्यायची. त्यांनी कधीच मोठेपणा मिरवला नाही; उलट साधेपणातूनच त्यांनी असंख्य माणसं जोडली.

आमच्या जवळच्या अनेक कुटुंबांतील वाद-मतभेद मिटवण्यासाठी लोक त्यांच्याकडे मोठया आशेने यायचे. ते कोणावरही रागावून किंवा आवाज चढवून बोलत नसत. अत्यंत शांतपणे दोन्ही बाजू समजून घेऊन प्रश्न सोडवत. त्यांच्या एका शब्दाला लोक मान द्यायचे, कारण त्या शब्दामागे प्रामाणिकपणा, आदर आणि माणुसकी असायची. अनेक विवाह जुळवण्यातही त्यांचा मोठा सहभाग होता. कित्येक संसार त्यांच्या प्रयत्नांमुळे आज सुखाने उभे राहिले आहेत. त्यांचे आडनाव जरी भालेराव असले तरी तपासे, पगारे, मोकळ, भोसले, जमदाडे, शिरसाट, शिंगाडे, जगताप, गायकवाड अशा अनेक कुटुंबांमध्ये ते घरातील ज्येष्ठ सन्मानित व्यक्ती होते. त्यांचा शब्द आमच्या सर्वांसाठी प्रमाण होता. प्रत्येकाशी त्यांचे प्रेमाचे, स्नेहाचे आणि विश्वासाचे नाते होते. म्हणूनच त्यांच्या जाण्याने फक्त भालेराव कुटुंबाचीच हानी झालेली नाही, तर अनेक नात्यांचा आधार हरपला आहे.

त्यांच्या पश्चात माझी संजू मावशी, आई, मावस भाऊ डॉ. सचिन, तसेच मुली साधना आणि प्रतिभा, सून, जावई, नातवंडे, भाऊ, चुलते, चुलत भाऊ असा मोठा परिवार आहे. अत्यंत गरीब परिस्थितीत शिक्षण घेऊन त्यांनी सर्वांना शिक्षण घेण्याची कायम प्रेरणा दिली. माझी आई अंगणवाडीत मदतनीस होती, लहान मुलांना ती तिच्या परीने शिकवायची, माझे दोन्ही मामा शिक्षण क्षेत्रात होते, त्यांची मुलं, मी, माझी पत्नी कल्पना, माझी बहीण पौर्णिमा आणि डॉ. सचिन, साधना व प्रतिभा, जावई प्रा. डॉ. सचिन भोसले देखील शिक्षक आहोत तसेच आमच्या नात्यातील अनेकजण केवळ त्यांच्याच मार्गदर्शनाने या क्षेत्रात आले. सर्वजण आपापल्या क्षेत्रात यशस्वीरित्या कार्यरत असलो तरी काकांची उणीव कोणत्याही यशाने भरून निघणारी नाही. कारण काही माणसं घरात नसली तरी त्यांची सावली कायम मनात असते.

आज काका आपल्यात नाहीत, हे मानायला मन तयार नाही. पण त्यांनी दिलेला प्रेमाचा, माणुसकीचा आणि समंजसपणाचा वारसा कायम स्मरणात राहील. त्यांच्या आठवणी प्रत्येक क्षणी डोळे पाणावतील, त्यांचं साधं, सुंदर आणि माणुसकीने भरलेलं आयुष्य कायम प्रेरणा देत राहील. काकाचं असं जाणं हे न पचणार दुःख आहे. असा माणूस आयुष्यात मी पाहिला नाही आणि पाहणार ही नाही.

आदरणीय काकांना भावपूर्ण श्रद्धांजली

**तुमचा**
**डॉ.संदीप उर्फ बाबू तपासे**

## आदर्श शिक्षक, प्रेमळ माणूस आणि कुटुंबाचा आधारवड

माणूस जन्माला येतो, जगतो आणि एक दिवस निघून जातो. पण काही माणसे अशी असतात की, त्यांचे जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे निधन नसते तर एका विचाराचा, एका संस्कारांचा, एका आधारवडाचा अंत असतो. कै. भालेराव सरांचे अचानक झालेले अपघाती निधन हे असेच मन सुन्न करून टाकणारे दुःख आहे. त्यांच्या जाण्याने केवळ भालेराव कुटुंब नव्हे, तर मित्रपरिवार, नातेवाईक, विद्यार्थी, सहकारी आणि समाजातील अनेकांच्या आयुष्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

आजही अनेकांच्या मनाला एकच प्रश्न सतावत आहे - इतक्या शांत, संयमी, प्रेमळ आणि निरपेक्ष व्यक्तीला नियतीने इतक्या अचानक का हिरावून नेले? त्यांच्या जाण्याची बातमी ऐकताच प्रत्येकाच्या मनात धक्का बसला. काही क्षणांसाठी कोणालाच विश्वास बसत नव्हता की, नेहमी हसतमुखाने भेटणारे, प्रत्येकाला आपुलकीने विचारपूस करणारे भालेराव सर आता आपल्या सोबत नाहीत. भालेराव सर हे केवळ शिक्षक नव्हते, तर ते अनेकांसाठी जीवन जगण्याची प्रेरणा होते. शिक्षक या शब्दाचा खरा अर्थ काय असतो, हे त्यांनी आपल्या आयुष्यभराच्या कार्यातून दाखवून दिले. शिक्षण ही फक्त नोकरी नसून समाज परिवर्तनाचे साधन आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकातील ज्ञान दिले नाही, तर जीवन जगण्याचे संस्कार दिले.

त्यांच्या वर्गात शिकलेला प्रत्येक विद्यार्थी आजही सांगतो की, सर शिकवत नव्हते, तर जीवन समजावून सांगत होते. त्यांची शिकवण्याची पद्धत अत्यंत साधी, संयमी आणि विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारी होती. एखादा विद्यार्थी अभ्यासात मागे असेल, अडचणीत असेल, तर त्याला कधीही कमी लेखले नाही. उलट त्याला धीर देऊन पुढे जाण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा मितभाषी आणि शांत स्वभाव. त्यांनी कधीही मोठेपणाचा आव आणला नाही. साधेपणातच त्यांनी आयुष्याचे खरे सौंदर्य जपले. आयुष्यात कितीही संघर्ष आले, परिस्थिती कितीही कठीण झाली तरी त्यांच्या चेहऱ्यावरचा शांतपणा कधी कमी झाला नाही. भालेराव सरांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. संघर्ष त्यांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग होता. अनेक अडचणी, आर्थिक संकटे, परिस्थितीची मर्यादा - या सगळ्यांवर मात करून त्यांनी स्वतःचे शिक्षण पूर्ण केले. त्यामुळेच गरिबीची जाणीव त्यांना आयुष्यभर होती. गरीब विद्यार्थ्यांची वेदना, त्यांच्या अडचणी ते मनापासून समजून घेत असत.



माजी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सुधाकर भालेराव सर

आज अनेक कुटुंबातील मुले चांगल्या पदावर आहेत, शिक्षित झाली आहेत, यामागे भालेराव सरांचे मार्गदर्शन मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनी अनेकांना शिक्षणासाठी मदत केली. कुणाला पुस्तके दिली, कुणाला फी भरण्यास मदत केली, तर कुणाला योग्य मार्ग दाखवला. त्यांनी कधीही या गोष्टींचा गाजावाजा केला नाही. मदत करणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यांनी केवळ स्वतःचेच नव्हे तर भावांचे कुटुंबही उभे केले. स्वतःच्या जबाबदाऱ्यांसोबत कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला आधार दिला. आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्याचे, नात्यांना जपण्याचे महान कार्य त्यांनी आयुष्यभर केले. त्यामुळेच आज त्यांच्या जाण्याने संपूर्ण कुटुंब जणू पोरके झाले आहे.

भालेराव सर हे कुटुंबाचे खरे आधारस्तंभ होते. त्यांच्या उपस्थितीने घरात एक सुरक्षिततेची भावना होती. प्रत्येक निर्णयात त्यांचा सल्ला महत्त्वाचा असायचा. त्यांच्या शब्दात अनुभव, प्रेम आणि मार्गदर्शन असायचे. घरातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकासाठी ते विश्वासाचे ठिकाण होते. ते आपल्या मुलांसाठी केवळ वडील नव्हते, तर आदर्श होते. त्यांनी आपल्या मुलांना उत्तम संस्कार दिले. स्वतःचे आयुष्य संघर्षात गेले, पण मुलांच्या शिक्षणात त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही. त्याच संस्कारांचे फळ म्हणजे आज त्यांचा मुलगा डॉक्टर आहे. एक मुलगी प्राथमिक शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचा वसा पुढे चालवत आहे आणि दुसरी मुलगी फार्मसी कॉलेजमध्ये प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहे. ही केवळ मुलांची यशोगाथा नाही, तर एका वडिलांच्या कष्टांची, संस्कारांची आणि दूरदृष्टीची कमाई आहे. मुलांनी मिळवलेले यश पाहून भालेराव सरांच्या डोळ्यांत समाधान असायचे. कारण त्यांनी आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण कुटुंब घडवण्यासाठी खर्च केला होता.

त्यांचे जावई प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेत बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्राशी जोडलेले हे संपूर्ण कुटुंब म्हणजे भालेराव सरांच्या विचारांचा आणि संस्कारांचा विस्तारच आहे. त्यांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व पुढच्या पिढीतही जपले गेले आहे. भालेराव सरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार केवळ पुस्तकात वाचले नाहीत, तर ते प्रत्यक्ष आयुष्यात जगले. शिक्षण, समता, माणुसकी आणि स्वाभिमान या मूल्यांना त्यांनी आपल्या जीवनाचा आधार बनवले. त्यांनी कधीही जाती-पातीचा विचार केला नाही. त्यांच्या दृष्टीने माणूस महत्वाचा होता.

त्यांनी प्रत्येकाशी प्रेमाने वागण्याचा आदर्श घालून दिला. एखाद्या माणसाने दुसऱ्या माणसाशी कसे वागावे, हे शिकायचे असेल तर भालेराव सरांचे आयुष्य पाहावे लागेल. त्यांनी कोणालाही दुखावले नाही. कुणाविषयी कटुता ठेवली नाही. प्रत्येकाच्या आनंदात सहभागी झाले आणि दुःखात आधार बनले. त्यांचा नातवंडांवर विशेष जीव होता. नातवंडांसोबत ते स्वतःही लहान व्हायचे. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य पाहून त्यांना आनंद मिळायचा. आज त्या लहानग्यांना कदाचित मृत्यूचा अर्थ समजणार नाही, पण त्यांना एवढे मात्र जाणवत असेल की, त्यांच्यावर निस्सीम प्रेम करणारा हात कायमचा दूर गेला आहे. भालेराव सरांच्या अंत्यविधीसाठी जमलेला मोठा समुदाय हा त्यांच्या प्रेमळ आणि मितभाषी स्वभावाची साक्ष देणारा होता. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू होते. अनेकांच्या ओठांवर त्यांच्या आठवणी होत्या. कोणी त्यांच्या मदतीबद्दल सांगत होते, तर कोणी त्यांच्या साधेपणाबद्दल. काहीजण शांतपणे उभे राहून फक्त अश्रूंनी त्यांना निरोप देत होते.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्यासाठी किती लोक मनापासून रडतात, यावरून त्या व्यक्तीचे आयुष्य किती महान होते हे समजते. भालेराव सरांनी माणसे जोडली होती. त्यांनी प्रेम कमावले होते. म्हणूनच त्यांच्या जाण्याने इतकी माणसे हळहळली. आज त्यांच्या आठवणी प्रत्येकाच्या मनात आहेत. त्यांचे हसणे, त्यांचा शांत आवाज, त्यांचे मार्गदर्शन, त्यांची साधी राहणी, त्यांची माणुसकी - हे सर्व आठवले की डोळे पाणावतात. काही माणसे शरीराने दूर जातात, पण त्यांच्या आठवणी आणि संस्कार कायम जिवंत राहतात. भालेराव सर हे त्यापैकीच एक होते. त्यांच्या जाण्याने समाजाची मोठी हानी झाली आहे. आजच्या काळात स्वार्थ, स्पर्धा आणि दिखावा वाढत असताना भालेराव सरांसारखी साधी, प्रामाणिक आणि माणुसकी जपणारी माणसे फार कमी उरली आहेत. त्यांनी आयुष्यभर कोणालाही कमी लेखले नाही. स्वतःच्या यशाचा गर्व केला नाही. इतरांना पुढे नेण्यातच त्यांनी आनंद मानला.

त्यांच्या आयुष्याकडे पाहिले की समजते - मोठेपणा हा पैशात किंवा पदात नसतो, तर माणुसकीत असतो. भालेराव सरांनी हेच शिकवले. त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला, पण संघर्षाला कधीही शरण गेले नाहीत. उलट त्या संघर्षातूनच त्यांनी अनेकांना उभे राहण्याची प्रेरणा दिली. आज त्यांचे कुटुंब अतोनात दुःखात आहे. एक वडील, एक पती, एक आजोबा, एक भाऊ आणि एक मार्गदर्शक हरपल्याचे दुःख शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. पण त्याचवेळी त्यांनी दिलेले संस्कार, त्यांची शिकवण आणि त्यांची माणुसकी हीच त्यांच्या कुटुंबाला पुढे जगण्याची ताकद देईल. भालेराव सरांचे आयुष्य म्हणजे संघर्षातून उभे राहून इतरांसाठी जगण्याचा आदर्श होता. त्यांनी स्वतःसाठी कमी आणि इतरांसाठी जास्त जगले. त्यामुळेच त्यांचे आयुष्य खऱ्या अर्थाने यशस्वी होते.

आज ते आपल्यात नसले तरी त्यांनी दिलेली शिकवण कायम जिवंत राहील. त्यांच्या आठवणी प्रत्येकाच्या मनात कायम राहतील. त्यांनी केलेले कार्य, त्यांनी जोडलेली माणसे आणि त्यांनी दिलेले संस्कार हेच त्यांचे खरे स्मारक असेल. भालेराव कुटुंबाला या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो, हीच त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली..

**- डॉ. सचिन मच्छिंद्र भोसले**
प्राचार्य, प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालय, प्रवरानगर

## देवमाणूस हरपला...

सूर्य उगवून बराच वेळ झाला होता. सर्वत्र प्रकाश पसरला होता. रविवार, दिनांक १७/०६/२०२६ ची ही सकाळ अचानक दुःखद बातमी घेऊन धडकली की, भालेराव सरांचा अपघात झाला असून त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे आणण्यात आले आहे. ही बातमी ऐकताच काळजात धस्स झाले. लख्ख प्रकाशातही काळाकुट्ट अंधार पडल्यासारखे वाटू लागले. जे व्हायला नको होते, तेच झाले. या अपघातात सरांचे निधन झाले होते. आमचे संपूर्ण कुटुंब शोकसागरात बुडून गेले.



माजी विद्यार्थ्यांकडून कृतज्ञता सोहळ्या प्रसंगी सुधाकर भालेराव सरांचा सत्कार करताना विद्यार्थिनी

एका देवमाणसाला असे अनपेक्षित मरण यावे, हे मनाला पटणारे नव्हते. पण म्हणतात ना, नियती कुणालाही माफ करत नाही. तरीही मनात प्रश्न येतो की, नियती इतकी निष्ठुर का असावी? एका देवासमान माणसाला अशा अपघातात का घेऊन जावे? एका पुण्यवान माणसाला असे मरण यावेच कसे? ज्या माणसाने कधीच कोणाचे वाईट केले नाही, कोणाचे वाईट चिंतिले नाही, ज्याच्या हातून कोणतेही पाप घडले नाही, अशा सोज्वळ, प्रेमळ, दयावान आणि निस्वार्थी माणसाला नियतीने अशी कवळी का घालावी?

त्यांच्या जाण्याने त्यांच्या हसऱ्या-खेळत्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. संपूर्ण कुटुंब दुःखसागरात बुडून गेले. या संसाररूपी बागेतून प्रत्येकालाच एक दिवस जावे लागते; पण जाण्यालाही काही कारण असावे लागते. काही वेळा यमदूत असा अचानक येतो की, जायचे नसतानाही माणसाला घेऊन जातो. त्यांच्या अपघाती निधनाने त्यांच्या कुटुंबावर कधीही न विसरता येणारा आघात झाला.

घरची परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. घरात कोणीही शिक्षक नसताना चार भावंडांमध्ये सरांनीच आपले शिक्षण पूर्ण केले. त्यावेळी शाळेत जाण्यासाठी कोणतेही साधन नव्हते. डीग्रस गावातून असी गावापर्यंत जवळजवळ नऊ-दहा मैलांची पायपीट करून त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण पूर्ण केले आणि पुढे रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून रुजू झाले.

तुकाराम बाबांच्या पोटी जन्मलेला सुधाकर नावाचा हा हिरा असा चमकला की, स्वतः झिजूनही त्याने आपल्या शीतल प्रकाशाने संपूर्ण भालेराव कुटुंब उजळून टाकले. सुधाकर नावाला साजेसे असे कार्य त्यांनी केले. मनात कुठलाही स्वार्थ न ठेवता आपल्या सर्व भावंडांवर त्यांनी अलौकिक प्रेम केले. चुलते, चुलत भाऊ, पुतणे - सर्वांवर त्यांनी मायेचा वर्षाव केला. कुटुंबाचा आधारवड बनून त्यांनी आपल्या मुलांनाही उच्च शिक्षित केले. आपल्या मुलांवर त्यांचे इतके प्रेम होते की, त्या प्रेमाचे वर्णन करण्यासाठी शब्द अपुरे पडतात.

अशा या परिसस्पर्शी व्यक्तीचा माझा व्याही म्हणून परिचय झाला. त्यांच्या मोठ्या मुलीचा विवाह माझ्या मोठ्या मुलासोबत झाला आणि आम्ही नव्या नात्यांची सुरुवात केली. उच्चशिक्षित जावई मिळाल्याने ते स्वतःला धन्य समजत असत. अभिमानाने सर्वांना सांगत असत, माझा जावई उच्चशिक्षित आणि गुणवान आहे. सुशिक्षित कुटुंब पाहून त्यांचा ऊर अभिमानाने भरून येत असे. त्यांनी केलेल्या कष्टाचे फळ त्यांच्या पदरात पडले होते. आनंदाचे दिवस अनुभवत असतानाच मृत्यूने त्यांच्यावर झडप घातली आणि संपूर्ण कुटुंबाला दुःखसागरात लोटून ते अशा दूरच्या प्रवासाला निघून गेले, जिथून कोणीही परत येत नाही.

सुधाकर नावाचा हा परिस संपूर्ण भालेराव कुटुंबाला स्पर्शून गेला आणि भालेराव कुटुंबाचे सोने करून गेला. स्वतः चंदनापरी झिजला आणि सर्वांना सुगंध देऊन गेला. मी भगवान बुद्धांना प्रार्थना करतो की, या दुःखाक्रांत भालेराव कुटुंबाला या दुःखातून सावरण्याचे सामर्थ्य द्यावे. अशा या देवमाणसास मी माझ्या भोसले कुटुंबाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना. दादा, तुमचा सहवास आज नसला तरी तुमच्या कार्याचा सुगंध आमच्या अवतीभोवती सदैव दरवळत राहील. तुमचे जाणे कायमचे दुःख देऊन गेले. जीवन क्षणभंगुर आहे, हे तुमच्या जाण्याने कळले.

**भोसले परिवार, वरवंडी**



चिंचोली गुरव शाळेतील लाडक्या माजी विद्यार्थ्यांसोबत सुधाकर भालेराव सर



नाशिक रोड येथे मुलगा डॉ. सचिन भालेराव यांच्या हॉस्पिटल उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना सुधाकर भालेराव सर



आपल्या लाडक्या कुटुंबासोबत एका आनंदाच्या क्षणी सुधाकर भालेराव सर


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)

मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

We treat He cure's
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५




# आषाढी वारीतील दिंड्यांसाठी मुबलक गॅस टाक्या द्या - आ. खताळ

## मुख्यमंत्र्यांकडे मागणी



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

आषाढी वारीला राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरला येणाऱ्या दिंड्यांसाठी मोठ्या प्रमाणावर गॅस टाक्यांची आवश्यकता भासत असते. या कालावधीत गॅस टंचाई निर्माण होऊ नये व वारकऱ्यांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिर्डी येथे निवेदनाद्वारे महत्त्वपूर्ण मागणी केली आहे.

आमदार खताळ यांनी म्हटले आहे की, आषाढी वारीच्या काळात राज्यातील अनेक गावांमध्ये अन्नछत्रे, महाप्रसाद, वारकऱ्यांसाठी मोफत भोजन केंद्रे आणि तात्पुरत्या निवास व्यवस्था उभारल्या जातात. हजारो सेवेकरी दिवस-रात्र वारकऱ्यांच्या सेवेत कार्यरत असतात. अशा परिस्थितीत गॅस टाक्यांचा पुरवठा सुरळीत राहणे अत्यंत आवश्यक असते. मात्र, वारीदरम्यान अचानक वाढणाऱ्या मागणीमुळे काही भागांमध्ये गॅस टंचाई निर्माण होण्याची शक्यता असते. त्याचा थेट परिणाम अन्नछत्रे आणि भोजन व्यवस्थेवर होऊ शकतो. परिणामी, हजारो वारकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

ही गंभीर बाब लक्षात घेऊन आमदार खताळ यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात संबंधित विभाग, जिल्हा प्रशासन तसेच गॅस वितरण कंपन्यांना तातडीने आवश्यक त्या सूचना देण्याची मागणी केली आहे. वारी मार्गावरील गावांमध्ये तसेच प्रमुख मुक्काम स्थळी अतिरिक्त गॅससाठा उपलब्ध ठेवावा, गॅस वितरणासाठी विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करावेत आणि सेवाभावी संस्था व अन्नछत्रांना प्राधान्याने गॅस पुरवठा करण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा असून, लाखो भाविकांची सेवा करणे ही शासनाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. वारीदरम्यान कोणत्याही वारकऱ्याला अन्न, पाणी किंवा मूलभूत सुविधांसाठी त्रास होऊ नये, यासाठी शासनाने नियोजनबद्ध उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दरम्यान, वारकऱ्यांच्या मूलभूत गरजांचा विचार करून शासनाकडे वेळेवर पाठपुरावा केल्याबद्दल वारकरी संप्रदाय, दिंडी प्रमुख तसेच विविध सेवाभावी संस्थांकडून आमदार खताळ यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# आदिवासी गायिका सुरेखा कुलाळ यांना वामनदादा कर्डक पुरस्काराने सन्मानित



राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सुप्रसिद्ध आदिवासी गायिका सौ. सुरेखा गोरक्षनाथ कुलाळ ह्या गेल्या अनेक वर्षांपासून गायन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्यांना लहानपणापासूनच कलेची आवड असल्यामुळे त्यांनी विविध ठिकाणी कार्यक्रमास भाग घेऊन आपले सर्वांच्या मनात उत्कृष्ट स्थान निर्माण केले आहे.

तसेच, त्यांची अनेक स्वताची गाणी देखील त्यांच्या 'सुरेखा कुलाळ' या युट्यूब चॅनलवर प्रसारित झालेली आहेत, आणि ती गाणी खूपच प्रसिद्ध झाली आहेत. भावगीत, भक्तीगीत, भीमगीत, कोळीगीत यांसारखी अनेक गीते सुपरहिट झालेली आहेत. तसेच, त्यांना या कलेचा गौरव म्हणून आजवर अनेक ठिकाणी पुरस्कार मिळाले आहेत.

त्याच बरोबर गायिका सौ. सुरेखा गोरक्षनाथ कुलाळ ह्यांना मिळालेल्या मानधनातून काही तरी समाजसेवा करावी म्हणून त्यांना मिळालेल्या मानधनातून शालेय शैक्षणिक साहित्य वाटप, गोरगरिब जनतेला मदत करणे, आदिवासी आश्रमशाळेंना काही, सारखे अनेक समाजसेवेचे उपक्रम त्या करत आल्या आहेत.

आदिवासी गायिका सौ. सुरेखा गोरक्षनाथ कुलाळ यांना लोककवी वामनदादा कर्डक पुरस्काराने गौरविण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्वच ठिकाणांहून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मंगल रासने यांचे निधन



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

अकोले ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच अशोक उर्फ बाळासाहेब रासने यांच्या पत्नी श्रीमती मंगल अशोक उर्फ बाळासाहेब रासने (वय ७२) रा. महालक्ष्मी कॉलनी, अकोले यांचे शनिवार दि. २३ मे २०२६ रोजी सायं. ६ वाजून १५ मिनिटांनी अल्प आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे, पतवंडे, चार भाऊ, भावजय असा मोठा परिवार आहे. रविवार सकाळी ८ वाजता प्रवरातीरी, सिद्धेश्वर मंदिर, अकोले या ठिकाणी त्यांचा अंत्यविधी पार पडला. उद्योजक विशाल, सौ. वैशाली संदीप डांगरे, सौ. विद्या जितेंद्र भडाले यांच्या त्या मातोश्री होत.

अमरावती येथील व्यवसायीक प्रकाश, कुमार, अनिल व प्रविण तिवाटने यांचे ते बंधू होत. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल अकोले शहर व कासार समाजामध्ये शोक व्यक्त केला जात आहे.

# मुतखेल आश्रम शाळेचा उल्लेखनीय निकाल



राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

भंडारदरा धरण जलाशय व अतिदुर्गम अभयारण्य क्षेत्र परिसरातील येणाऱ्या व सदैव नैसर्गिक व भौतिक अडचणीचा सामना करणाऱ्या शासकीय माध्यमिक आश्रम शाळा रतनवाडी युनिट-मुतखेल येथील आश्रम शाळेने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत विविध परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.


या शाळेने मार्च २०२६ मध्ये झालेल्या एस. एस. सी. परीक्षेत प्रतिवर्षाप्रमाणे १००% निकालाची परंपरा कायम राखली असून, दहावीच्या परीक्षेत ६ विद्यार्थी विशेष श्रेणीत, २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर २ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. शाळेत प्रणय अशोक इदे-प्रथम, साक्षी संपत शिंदे-द्वितीय, प्रणाली राजाराम भांगरे-तृतीय आलेले आहेत.

तसेच, एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या इ. ५ वी व ८ वी स्कॉलरशिप परीक्षेत पाचवीचे २, तर आठवीचे २५ विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत. तसेच आदिवासी विकास विभागामार्फत घेण्यात आलेल्या जेई व नीट प्रवेश स्पर्धा परीक्षेत शाळेचे प्रणय अशोक इदे व परते राधाबाई बहिरू या विद्यार्थ्यांची निवड झाली असून, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खर्च आदिवासी विकास विभागामार्फत मोफत केला जाणार आहे.

शाळेने विविध परीक्षेत गुणवत्ता मिळाल्याबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे सरपंच दिपाली रोंगटे, उपसरपंच कैलास इदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादु मोहरे, उपाध्यक्ष विजय इदे तसेच सर्व सदस्य, मुख्याध्यापक आदिनाथ सुतार, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# रायगडच्या आंबेनळी घाटात भीषण अपघात

## स्कॉर्पिओ दरीत कोसळली, ८ जणांचा मृत्यू



रायगड (प्रतिनिधी)-

रायगडच्या आंबेनळी घाटात रविवारी रात्री भीषण अपघात घडल्याची घटना समोर आली आहे. या घाटात एक स्कॉर्पिओ गाडी खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत आठ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे.

प्राथमिक माहितीनुसार, महाबळेश्वर ते पोलादपूर दरम्यानच्या मार्गातील आंबेनळी घाटाच्या परिसरात ही दुर्घटना घडली. स्कॉर्पिओ गाडी खोल दरीत कोसळल्यामुळे मृत प्रवाशांचे मृतदेह वर आणण्यासाठी बरेच कष्ट घ्यावे लागत आहेत. आतापर्यंत आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पोलीस आणि इतर यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या आणि बचावकार्य सुरू झाले. बचाव पथकांना आतापर्यंत दोन मृतदेह शोधण्यात यश मिळाले आहे. ही स्कॉर्पिओ गाडी आंबेनळी घाटात जवळपास ५०० ते ७०० फूट खोल दरीत कोसळली आहे.

ही स्कॉर्पिओ गाडी साताऱ्यातील असल्याचे समजते. यामध्ये सातारा, आसगाव आणि कोरेगाव येथील पर्यटक असल्याची माहिती आहे. अद्याप अपघाताचे कारण आणि मृतांची ओळख पटलेली नाही. बचाव पथकाकडून स्कॉर्पिओ गाडीतील इतर प्रवाशांचे मृतदेह शोधण्याचे काम सुरू आहे.

रायगड आणि सातारा जिल्ह्यांच्या सीमेवरील अत्यंत धोकादायक समजल्या जाणाऱ्या आंबेनळी घाटात अनेकदा अपघात घडतात. हे सर्वजण कोकण किंवा महाबळेश्वर परिसरात फिरण्यासाठी आले असावेत, असा अंदाज वर्तवला जात आहे. स्थानिक प्रशासन, ट्रेकर्स आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले असून, खोल दरी आणि कठीण भूप्रदेशामुळे बचाव कार्यात अनेक अडचणी येत आहेत.

आतापर्यंत दोन प्रवाशांचे मृतदेह हाती लागले असून, उर्वरित सहा जणांचे मृतदेह शोधण्याचे काम सुरू आहे. रात्रीच्या अंधारात मृतदेह शोधण्यात बऱ्याच अडचणी येत होत्या. मात्र, दिवस उजाडल्याने बचावकार्याला वेग आला.

# काजव्यांच्या लखलखत्या प्रकाशाने खुलला सह्याद्री

## पर्यावरण संवर्धनासाठी निसर्गप्रेमींचे आवाहन...


छाया – विलास तुपे, राजूर

राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या, जंगल परिसर आणि ग्रामीण भागात सध्या रात्रीच्या वेळी काजव्यांचा अद्भुत प्रकाशसोहळा पाहायला मिळत आहे. पावसाळ्याच्या आगमनापूर्वी दरवर्षी दिसणारा हा निसर्गाचा अनोखा चमत्कार अनुभवण्यासाठी राज्याच्या विविध भागांतून पर्यटक मोठ्या संख्येने सह्याद्री परिसरात दाखल होत आहेत. रात्रीच्या अंधारात चमचमणारे लाखो काजवे पाहून पर्यटक भारावून जात असून, संपूर्ण जंगल परिसर जणू आकाशातील तारकांनी उजळल्याचा भास निर्माण होत आहे. मे महिन्याच्या अखेरीस आणि जूनच्या सुरुवातीला काजव्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते. स्वच्छ हवा, ओलसर जंगल आणि नैसर्गिक अधिवासामुळे काजव्यांसाठी पोषक वातावरण निर्माण होते. मादी काजव्यांना आकर्षित करण्यासाठी नर काजवे प्रकाश निर्माण करतात आणि त्यातून निसर्गातील एक अद्भुत प्रकाशमहोत्सव अनुभवायला मिळतो.

दरम्यान, वाढत्या पर्यटनामुळे काजव्यांच्या अधिवासावर परिणाम होत असल्याची चिंता पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. मोबाईल फ्लॅश, तेज टॉर्च, वाहनांचे हेडलाईट, डीजेचा आवाज आणि प्लास्टिक कचरा यामुळे काजव्यांच्या जीवनचक्रावर विपरीत परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. कृत्रिम प्रकाशामुळे त्यांच्या प्रजनन प्रक्रियेलाही अडथळा निर्माण होत असल्याचे अभ्यासकांनी नमूद केले आहे.

पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांनी सांगितले की, काजवे हे जैवविविधतेचे महत्त्वाचे दूत आहेत. जंगल आणि पर्यावरण सुरक्षित राहिले तरच पुढील पिढ्यांनाही हा अद्भुत निसर्गसोहळा अनुभवता येईल. निसर्ग पर्यटन करताना प्रत्येकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. पर्यटकांनी जंगल परिसरात शांतता राखावी, मोबाईल फ्लॅशचा वापर टाळावा, काजव्यांना पकडू नये, प्लास्टिक कचरा टाकू नये, तसेच वनविभागाच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. निसर्ग फक्त पाहू नका तो जपाही, असा संदेश पर्यावरणप्रेमींनी दिला आहे.

# पेटंट : संशोधनाचे संरक्षण




पेटंट: हा शब्द लॅटिन भाषेतील पातेरे (झरींशीश) या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ उघड करणे असा होतो. पेटंट म्हणजे एखाद्या शोधासाठी सरकारकडून एखाद्या व्यक्ती, संस्था किंवा संघटनेला मर्यादित कालावधीसाठी (२० वर्षे) दिलेला कायदेशीर हक्क होय. या बदल्यात संशोधकाने आपल्या शोधाची संपूर्ण माहिती सार्वजनिकपणे उघड करणे आवश्यक असते. पेटंट धारकाच्या परवानगीशिवाय इतर कोणालाही त्या पेटंट केलेल्या उत्पादनाचे किंवा प्रक्रियेचे उत्पादन, वापर, विक्री किंवा आयात करता येत नाही. भारतामध्ये पेटंट प्रणाली खालील कायद्यांद्वारे नियंत्रित केली जाते: भारतीय पेटंट कायदा, १९७०

पेटंटसाठी आवश्यक घटक: सामान्यत इन्व्हेन्शन म्हणजे एखादा नवीन शोध होय, जो उत्पादन (मशीन / प्रॉडक्ट) किंवा प्रक्रिया (प्रोसेस) यांच्याशी संबंधित असतो. पेटंटचा उपयोग खालील क्षेत्रांमध्ये होऊ शकतो: प्रक्रिया (प्रोसेस), उत्पादन करण्याची पद्धत (मेथड ऑफ मॅन्युफॅक्चरिंग), यंत्र किंवा उपकरणे (मशीन), रासायनिक संयुगे (कॉम्पोझिशन ऑफ मॅटर), खेळणी, संगणक सॉफ्टवेअर, विद्युत उपकरणे, वनस्पती, प्राणी किंवा सूक्ष्मजीव (प्लांट्स, निमल्स, मायक्रोऑर्गनिझम्स), जैवतंत्रज्ञानातील प्रक्रिया (बायोटेक्नॉलॉजी प्रोसेसेस), व्यवसाय पद्धती (बिझनेस मेथड्स), औषधे व चिकित्सा (ड्रग्स अँड मेडिसिन्स) एखादे उत्पादन किंवा प्रक्रिया पेटंटसाठी पात्र होण्यासाठी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे:

१. नवीनता (नॉव्हेल्टी): शोध पूर्णपणे नवीन असावा. तो कोणत्याही स्वरूपात, जगात कुठेही पूर्वी सार्वजनिकरीत्या प्रकाशित झालेला नसावा. पेटंट अर्ज दाखल करण्यापूर्वी त्या शोधाची माहिती भारतात किंवा इतरत्र प्रकाशित झालेली नसावी. भारतामध्ये यासाठी १२ महिन्यांचा ग्रेस पीरियड दिला जातो.

२. तांत्रिकदृष्ट्या सहज अनुमान न करता येणारे / अभिनव पाऊल (नॉन-ऑब्व्हियसनेस / इन्व्हेंटिव्ह स्टेप): शोधामध्ये अभिनवता असावी. संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीस तो शोध सहज समजणारा किंवा स्पष्ट वाटता कामा नये. म्हणजेच, पूर्वीच्या ज्ञान, दस्तऐवज किंवा प्रकाशनांच्या आधारे तो शोध सहजपणे तयार करता येऊ नये.

३. उपयुक्तता (युटिलिटी): शोध उपयुक्त असावा आणि त्याचा औद्योगिक क्षेत्रात प्रत्यक्ष वापर करता येणे आवश्यक आहे.

**प्रा. डॉ. एकनाथ बायस**
अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर

# देशात कोरोनापेक्षा भयंकर परिस्थिती - विरोधकांचा दावा

मुंबई (प्रतिनिधी)-

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीत झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सोमवारी पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केली आहे. पेट्रोलच्या दरात प्रतिलिटर २.७२ रुपये, तर डिझेलच्या दरात २.८१ रुपयांची वाढ करण्यात आली असून, हे नवे दर २५ मेपासून तात्काळ लागू करण्यात आले आहेत. मागील दहा दिवसांतील ही चौथी दरवाढ असल्याने आधीच महागाईच्या झळा सहन करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. इंधन दरवाढीच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका सुरू केली असून, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारच्या धोरणांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी बोलताना केंद्र सरकारच्या धोरणांमुळे देशात कोरोनाकाळापेक्षाही अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली. त्यांनी आरोप केला की, सध्याची इंधन टंचाई कृत्रिम नसून केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांचा हा परिणाम आहे. अमेरिकेने भारतावर दबाव टाकत इराण आणि रशियाकडून तेल खरेदी न करण्याचा अप्रत्यक्ष निर्णय लादल्याचा दावा त्यांनी केला. अमेरिकेचे तेल महाग असले तरी तेच खरेदी करण्याची वेळ भारतावर आणली जात असल्याचे ते म्हणाले. सरकारच्या धोरणांमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किंमती आगामी काळात आणखी वाढतील, असा इशाराही त्यांनी दिला. पुढील काही दिवसांत पेट्रोलचे दर १५० रुपये, तर डिझेलचे दर १४० रुपयांपर्यंत पोहोचू शकतात, असा दावा त्यांनी केला.

# शिक्षण प्रसारक संस्थेवर...


पान नं. १ वरुन-


मतमोजणीनंतर मालपाणी पॅनलच्या समर्थकांनी जल्लोष करत विजय साजरा केला. मात्र दुसरीकडे, अॅड. जोंधळे यांना मिळालेला पाठिंबा हा संस्थेतील काही सभासदांमधील अंतर्गत नाराजीचा संकेत मानला जात आहे. संस्थेच्या कारभारातील पारदर्शकता, निर्णयप्रक्रिया आणि नेतृत्वशैलीबाबत असलेली नाराजी मतांच्या स्वरूपात दिसून आल्याची चर्चा काही सभासदांमध्ये सुरू आहे. सर्वाधिक ४९० मते मिळवत संजय मालपाणी हे अव्वल ठरले असले, तरी एकाकी लढतीत अॅड. संग्राम जोंधळे यांनी उभे केलेले आव्हान भविष्यातील संस्थात्मक आणि राजकीय बदलांचे संकेत देणारे मानले जात आहे. आगामी काळात संस्थेच्या निर्णयप्रक्रियेत आणि राजकीय घडामोडींमध्ये त्यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणुकीच्या निकालानंतर शहरातील शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात आता पुढील समीकरणांबाबत चर्चांना वेग आला आहे.

## संपादकीय...

### तापमानवाढीचे जागतिक संकट

जागतिक हवामान खात्याचे भाकीत आता प्रत्यक्षात उतरू लागले असून पृथ्वीवरील वाढते तापमान ही संपूर्ण मानवजातीसमोरील सर्वात मोठी चिंता बनली आहे. यंदाचा उन्हाळा हा गेल्या अनेक दशकांतील सर्वाधिक तीव्र उन्हाळा मानला जात आहे. देशातील अनेक शहरांमध्ये तापमानाने ४२ अंश सेल्सिअसची मर्यादा ओलांडली असून काही भागांत तापमान ४५ ते ४७ अंशांपर्यंत पोहोचले आहे. विदर्भ, मराठवाडा, राजस्थान, दिल्ली, उत्तर प्रदेश अशा अनेक प्रदेशांमध्ये उष्णतेच्या लाटा नागरिकांच्या जीवावर उठल्या आहेत. रस्ते ओस पडत आहेत, दुपारच्या वेळी कामकाज ठप्प होत आहे आणि उष्माघातामुळे मृत्यू होण्याच्या घटनांमध्येही वाढ होत आहे. ही केवळ भारतातील परिस्थिती नाही, तर युरोप, अमेरिका, चीन, आफ्रिका आणि आशियातील अनेक देशांमध्येही उष्णतेचे विक्रमी प्रमाण नोंदवले जात आहे. या संपूर्ण संकटामागे 'ग्लोबल वॉर्मिंग' अर्थात जागतिक तापमानवाढ हेच प्रमुख कारण असल्याचे आता निर्विवादपणे स्पष्ट झाले आहे. पृथ्वीवरील सरासरी तापमान सातत्याने वाढत असल्यामुळे पर्यावरणीय समतोल ढासळत चालला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या जागतिक हवामान संघटनेने काही वर्षांपूर्वीच याबाबत गंभीर इशारा दिला होता. औद्योगिकीकरणपूर्व १८५० ते १९०० या कालखंडातील पृथ्वीच्या सरासरी तापमानाचा आणि त्यानंतरच्या तापमानाचा तुलनात्मक अभ्यास करून संशोधकांनी भविष्यात तापमानात मोठी वाढ होईल, असे भाकीत वर्तवले होते. त्या काळात कोळसा, पेट्रोलियम, नैसर्गिक वायू यांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला नव्हता. जंगलांचे प्रमाण मोठे होते आणि कार्बन उत्सर्जनही मर्यादित होते. मात्र विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून जगभर औद्योगिकीकरण वेगाने वाढले. कारखाने, मोठमोठी शहरे, वाहनांची संख्या आणि ऊर्जा वापर प्रचंड वाढू लागला. याच काळात वातावरणात कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर हरितगृह वायूंचे प्रमाण झपाट्याने वाढले. परिणामी पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकून राहू लागली आणि तापमानवाढीचा वेग अधिक वाढला. संशोधकांनी २०२७ पर्यंत पृथ्वीचे तापमान औद्योगिकीकरणपूर्व काळाच्या तुलनेत दीड अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता व्यक्त केली होती आणि आजची परिस्थिती पाहता ते भाकीत खरे ठरत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हवामानातील बदलांचे दुष्परिणाम आता जगभर जाणवू लागले आहेत. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, चक्रीवादळे, पूर, वनवे आणि उष्णतेच्या लाटा यांची तीव्रता वाढत आहे. ज्या भागांना पावसाची गरज आहे त्या भागात पाऊस पडत नाही, तर काही भागांत अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होत आहे. हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत असून समुद्राची पातळी वाढत आहे. त्यामुळे किनारी भागांना भविष्यात मोठ्या संकटाचा सामना करावा लागू शकतो. मालदीव, इंडोनेशिया, बांगलादेश यांसारख्या देशांतील अनेक किनारी प्रदेशांना समुद्रग्रहणाचा धोका निर्माण झाला आहे. वाढत्या तापमानामुळे शेतीचे चक्र विस्कळीत होत आहे. पाण्याची टंचाई वाढत आहे. जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत असून अनेक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जंगलांमध्ये लागणाऱ्या आगींचे प्रमाण वाढत असून त्यात हजारो पशुपक्षी मृत्युमुखी पडत आहेत. याचा थेट परिणाम मानवी जीवनावर, आरोग्यावर आणि अर्थव्यवस्थेवर होत आहे. वाढते तापमान हे केवळ पर्यावरणीय संकट नसून सामाजिक आणि आर्थिक संकट देखील बनत आहे. या परिस्थितीसाठी सर्वाधिक जबाबदार मानवच आहे, हे वास्तव नाकारता येणार नाही. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करण्यात आली. सिमेंटची जंगले उभी राहिली. वाहनांची संख्या वाढली. कारखान्यांमधून आणि ऊर्जानिर्मिती केंद्रांमधून मोठ्या प्रमाणावर कार्बन उत्सर्जन सुरू झाले. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अमर्याद वापर करण्यात आला. परिणामी निसर्गाचा समतोल ढासळला. मात्र अजूनही परिस्थिती पूर्णपणे हाताबाहेर गेलेली नाही. योग्य वेळी योग्य पावले उचलली तर तापमानवाढ नियंत्रणात आणणे शक्य आहे. यासाठी सर्वप्रथम हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणे आवश्यक आहे. जीवाश्म इंधनांऐवजी सौरऊर्जा, पवनऊर्जा, जलऊर्जा यांसारख्या पर्यायी ऊर्जास्त्रोतांचा वापर वाढवणे गरजेचे आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून ती झाडे जगवण्यावर भर दिला पाहिजे. शहरांचे नियोजन पर्यावरणपूरक असावे.

युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
पाहिजेत
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

# कै. सुधाकर भालेराव यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## सेवापरायण माझे शिक्षक...




पंचवीस-तीस वर्षांपूर्वी शिक्षणाची परंपरा समाजमनात बऱ्यापैकी रूजली होती. ग्रामीण भागातही शिक्षणाचे मोल अशिक्षित असलेल्या मातापित्यांच्या मनात विस्तारत होते. काहिसा ज्ञानाचा प्रकाश किरण समाजमनात प्रज्वलित होत होता. शिक्षणाचे मोल विस्तारत होते हे खरे, पण ते शिक्षण समग्रतेचे होते. आपल्या मुलाला मार्क नाही मिळाले, तरी चालतील पण मुलाला घडवा असं सांगणारे पालक तेव्हा होते. हवे तर त्याला मारा. हाना. काही पण करा. पण शिक्षण द्या आणि त्याला माणूस घडवा अशी विनंती पालक करायचे. हा विचार म्हणजे खरे शिक्षण असं त्यावेळी मानले जाते. अशिक्षित असलेल्या पालकांना देखील शिक्षणाचा अर्थ समजला होता. खऱ्या शिक्षणाच्या वाटा विस्तारण्याकरीता समाज आणि शिक्षणातील सक्रिय सहभागी मनुष्यबळ सातत्याने प्रयत्न करत होते. मुळात त्याकाळी शिक्षकही समाजासाठी प्रेरक होते. त्यांच्यावर समाजाचा जितका विश्वास होता, तितका विश्वास असणारा दुसरा कोणताही घटक गाव पातळीवर नव्हता. मात्र त्याचवेळी हा विश्वास सार्थ करणारी जे काही शिक्षक होते त्यात सुधाकर भालेराव सरांचा समावेश होता.

आज जितकी चर्चा शिक्षणाच्या गुणवत्तेची होते आहे तितकी चर्चा आणि अपेक्षा तेव्हा करणारी कोणतीच पिढी आस्तित्वात नव्हती. शिक्षणाची गुणवत्ता म्हणजे काय याचा विचारही फारसा कोणी करत असेल, असे चित्र नव्हते. आणि गुणवत्तेचा विचारही त्यावेळी विशेष प्रयत्नाने केला जात नव्हता. किंबहूना मुलांचे मार्क म्हणजे शिक्षण हा विचारही ग्रामीण भागात प्रतिबिंबीत झालेला नव्हता. अशावेळी आपली मुलं शिकली पाहिजेत, इतकेच काय ते स्वप्न आई वडीलांचे असायचे. त्या स्वप्नांना बळ भरण्याचे काम त्यावेळी शाळा शाळांमध्ये शिकवणारे शिक्षकच करायचे. याचे कारण गावात उच्च शिक्षित असलेली आणि सामाजिक भान असणारी पिढी म्हणजे शिक्षक असं मानले जात असायचे. अशावेळी शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवन-घडणीसाठी मार्गदर्शन करत, जीवन उन्नतीचा मार्ग दाखवणारी एकच व्यक्ती विश्वासार्ह होती ती म्हणजे गावातील विद्यालयातील शिक्षक. तो काळही तसाच होता. वर्गात जाऊन केवळ पाठयपुस्तक पूर्ण करणारी ते शिक्षक नव्हते. तोपर्यंत शिक्षकी पेशाचेही सरकारी करण आणि सरकारी कर्मचारी म्हणून त्यांच्याकडे कोणी पाहात नव्हते. शिक्षक हा गावातील सर्वाधिक आदराला पात्र असलेले एकमवे सदगृहस्थ होते. त्यावेळी शाळा शाळांमध्ये परिवर्तनाचे दूत असणारे अनेक शिक्षक अवतीभोवती असायचे. त्यांना सामाजिक भान जितके होते, तितकीच समाजाच्या उत्थानाची तळमळ होती. शिक्षणाने समाज परिवर्तन करता येणे शक्य आहे, हे त्यांनी त्यांच्या अगोदरच्या पिढीकडून शिकणे केले होते. शाहू, फुले, आंबेडकांचा विचार त्यावेळी शिकलेल्या माणसांच्या मनावर कोरला गेला होता. मध्यमवर्गीय असणारी माणसं ही समाजाशी नाते सांगणारी होती. त्यांनी स्वतःचा कोश निर्माण केला नव्हता. त्यामुळे स्वतःच्या पलिकडे पाहणारी ती पिढी होती. आपल्या जवळ जे काही आहे, त्यातील काही देण्यासाठी हात पुढे करणारी माणस होती. अशा प्रकारे आम्हा जीवनावर पुरोगामीत्वाच्या संस्काराची पेरणी करणारे छत्रपती शिवाजी विद्यालयात अध्यापन करणारे जे शिक्षक होते, त्यापैकी सुधाकर भालेराव सर हे एक होते.

भालेराव सर म्हणजे अत्यंत संयमी, मितभाषी असे व्यक्तीमत्व होते. वर्गात ते आले की, त्यांच्या चेह-यावर स्मित हास्य ठरलेले असायचे. आपण वर्गात प्रवेश केला की, विद्यार्थ्यांना आनंद व्हायला हवाच हिच त्यांची जाणीव आम्हा विद्यार्थ्यांना सातत्याने जाणवत राहायची. जेव्हा आम्ही विद्यार्थी होतो, त्यावेळी शिक्षकांनी सांगतिले की, ते सारे अत्यंत विश्वासाने केले जायचे. त्यांच्या शब्दांना आणि त्यांच्या प्रतिमाना आमच्या मनात देवा इतकेच स्थान होते. याचे कारण त्यांचे वागणे आम्हा विद्यार्थ्यांच्या सोबत नेहमीच अत्यंत सौम्य आणि प्रत्येक मुलाला समजून घेणारे असायचे. एके दिवशी त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना स्वाध्याय करण्यास सांगितले होते. मुळात त्याकाळी शिक्षकांनी काही स्वाध्याय, गृहपाठ किंवा तत्सम काही कार्य दिले की, ते वेळेवर पूर्ण करण्याचा अट्टहास केला जायचा. पालकही त्यादिशेने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, प्रेरणा दयायचे आणि वेळ आली तर हाताखालून काढले जायचे. अनेकदा शिक्षकांनी मारले आणि घरी ते सांगण्याची हिम्मत केली गेली, तर घरी देखील हमखास मार बसणार यात शंका नाही. त्यामुळे भितीने का होईना अभ्यास केला जायचा. असेच एकदा काही तरी कारणास्तव माझ्याकडून स्वाध्याय पूर्ण झाला नाही. त्यादिवशी सरांनी अभ्यास न करणाऱ्या विद्यार्थ्यांना उभे केले होते. मात्र त्याचवेळी प्रत्येकाला बोलावून घेत, अभ्यास न करण्याचे कारण विचारले जात होते. आणि विद्यार्थी जे काही सांगतो आहे, ते समजून घेण्याचा प्रयत्न केल जायचा. त्यांना सांगणारा विद्यार्थी प्रामाणिकपणे कारण सांगतो आहे हे पटले, तर शिक्षा केली जात नसायची. त्यादिवशी मी नेमके कारण जे काही सांगितले होते, ते मलाही न पटणारे होते, पण ते खरे होते. सरांसमोर मी प्रामाणिकपणाने चुक कबूल केली होती. त्यामुळे त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, तू तुझी चुक कबुल करतो आहेत. म्हणून तुला कोणतीच शिक्षा नाही. पण नेहमीच हा प्रामाणिकपणा जपायला हवा असं सांगण्यास ते विसरले नाहीत. मुळात सरांनी जे काही पेरायचा आहे, ते केवळ शब्दांनी पेरले नाही. मुखातून शब्दांचे सुविचार सांगण्याऐवजी त्यांनी संपूर्ण जीवनभर आपल्या वर्तनातून पेरण्याचा प्रयत्न केला. विद्यार्थ्यांसाठी शिकण्याचा वस्तूपाठ हा केवळ शिक्षकाच्या वर्तन अनुकरणाचाच असतो. त्यामुळे त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांसाठी काय दिले असा विचार मनात आला, तर त्यांनी माणूस होण्यासाठी जे काही हवे आहे, तो विचार सातत्याने मनात पेरण्याचे काम केले आहे.

भालेराव सर म्हणजे अत्यंत निर्गवी व्यक्तिमत्व होते. त्यांना आपले विद्यार्थी काहीतरी करता आहेत, हे ऐकले, वाचले तरी उर अभिमानाने भरून यायचा. माझे पुस्तके प्रकाशित झाल्याचे आणि पुरस्कार मिळाल्याच्या वर्तमानातील बातम्या वर्तमानात वाचल्या, तरी ते भेटल्यावर खास अभिनंदन करायचे. अनेकदा घरी येऊनही त्यांनी कौतुक केले आहे. आपला विद्यार्थी आहेत, असे अभिमानाने म्हणायचे. शिक्षकासाठी आवश्यक असणारे सारे गुण त्यांच्यात साठवून भरलेले होते. त्यांचे जगणे हाच शिक्षकांसाठी वस्तूपाठ होता. त्यांनी पेरलेले विचार आम्हा अनेक विद्यार्थ्यांच्या मनात घर करून आहे. सर शेवटपर्यंत चांगुलपणाची वाट चालत राहिले, त्यांनी आपली सेवापरायण वृतीचा कधीच त्याग केला नाही. मात्र दुर्दैवाने त्यांचा रस्ते अपघातात त्यांचा मृत्यू झाला ही वार्ता आम्हा सर्वांसाठी धक्कादायक आहे. माणसांचा मृत्यू ही न सांगता येणारी गोष्ट आहे. ती कोणालाही टाळता येत नाही, पण असे अचानक निघून जाणे.अत्यंत धक्कादायक होते. आता सर भेटणार नाही, त्यांच्याशी अत्यंत स्नेहपूर्ण असणारा संवादही पुन्हा होणार नाही. अखेरची त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली...

**– संदीप वाकचौरे सर**
**संगमनेर**

# अमृतवाहिनी तंत्रनिकेतनमध्ये डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन केंद्र सुरू

संगमनेर
(युवावार्ता प्रतिनिधी)

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी तंत्रनिकेतन, संगमनेर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी डिप्लोमा प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रियेअंतर्गत मार्गदर्शन व फॅसिलिटी सेंटरची सुरुवात करण्यात आली असून, या उपक्रमास विद्यार्थ्यांचा व पालकांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ यांनी दिली आहे.



महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री तथा वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी तंत्रनिकेतनने सातत्याने विविध उपक्रम राबवले असून, विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी निर्माण करून दिल्या आहेत. विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी असलेल्या समन्वयामुळे मागील वर्षीच्या ६२७ विद्यार्थ्यांना चांगल्या पॅकेजवर नोकऱ्या मिळाल्या आहेत.

येणाऱ्या शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश प्रक्रियेची मुदत २२ जूनपर्यंत आहे. या फॅसिलिटी सेंटरमध्ये विद्यार्थ्यांना शाखा निवड मार्गदर्शन, ऑनलाईन अर्ज भरणे, डॉक्युमेंट व्हेरिफिकेशन, प्रवेश प्रक्रियेबाबत संपूर्ण मार्गदर्शन तसेच करिअर संदर्भात तज्ज्ञ मार्गदर्शन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना योग्य शाखा निवड करून प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे समन्वयकांनी सांगितले.

अमृतवाहिनी तंत्रनिकेतनमध्ये आधुनिक प्रयोगशाळा, अनुभवी प्राध्यापक वर्ग, उत्कृष्ट प्लेसमेंट सुविधा तसेच उद्योगाभिमुख शिक्षण पद्धतीमुळे विद्यार्थ्यांचा कल मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत आहे.

सदर फॅसिलिटी सेंटर प्राचार्य प्रा. व्ही. बी. धुमाळ व उपप्राचार्य प्रा. जी. बी. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. एस. एस. तळेकर, प्रा. आर. के. सातपुते व त्यांच्या टीम मेंबर्स, तसेच थेट द्वितीय वर्ष प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. व्ही. डी. कांडूरे, प्रा. ए. एस. दिघे व त्यांच्या टीम मेंबर्स यांच्या मार्फत प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्यात येत आहे.

## तामिळनाडू राज्यात...

पान १ वरुन-

त्यानंतर राज्यपालांचे एडीसी म्हणून त्यांनी २०१९ ते २०२१ दरम्यान राजभवनात सेवा बजावली. पुढे थेनी, मदुराई आणि शिवगंगा जिल्ह्यांमध्ये पोलिस अधीक्षक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. लोकसभा निवडणुकीदरम्यान निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची बदलीही करण्यात आली होती. दरम्यान, त्रिची पोटनिवडणुकीत अभिनेत्री तृषा कृष्णन निवडणूक लढवणार असल्याच्या चर्चाही रंगू लागल्या आहेत. मात्र याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र त्या आधीच मुख्यमंत्री विजय यांनी निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या भागात अनुभवी आणि कडक प्रशासनिक अधिकारी म्हणून ओळख असलेल्या प्रवीण डोंगरे यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PATHAN AMJAD RASHID KHAN
TO NEW NAME AS
AMJAD RASHID PATHAN
ADD - BHARAT NAGAR SANGAMNER 422605 DIST - AHILYANAGAR

**नावात बदल**
माझे जुने नाव
तरन्नुम बी अ. रहमान पठाण
माझे नवीन नाव
तरनुम बालम पठाण
पत्ता– रा. संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर

**नावात बदल**
माझे जुने नाव
नवनाथ संपत भोर असे होते ते आता बदलनू नवीन नाव प्रिजत संपत भोर असे झाले आहे तरी वरील दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे.
पत्ता - मु. आंबड, पो. धामणगाव आवारी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**नावात बदल**
माझे जुने नाव
बालमभाई यासीन पठाण
माझे नवीन नाव
बालम यासीन पठाण
पत्ता– रा. संगमनेर, ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर - ०१
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
स्वयंपाकीन – ०१ (२ व्यक्तींचा स्वयंपाक)
ड्रायव्हर – ०१
क्लार्क – ०१ (लेडीज/जेन्ट्स)
वॉचमन – ०१
अनुभवास प्राधान्य
9822334431

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६






# चार पक्ष बदलणाऱ्यांनी आपली निष्ठा तपासावी - अजय फटांगरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा हा पहिल्यापासून काँग्रेसचा बालेकिल्लाच होता. अनेकांना मंत्रिपदे विरोधी पक्षनेते पदे देऊन अनेकांनी पक्षांतर केले आणि आज ते सत्ताधारी पक्षात आहेत. हे खरे आहे याशिवाय संगमनेरचे नवीन लोकप्रतिनिधी चार पक्षातून आलेले आहे त्यांनी पक्षनिष्ठ बाबत पहिले पालकमंत्री व त्यांच्या वरिष्ठांना विचारले पाहिजे आणि स्वतः कोणत्या पक्षात आहेत हे पहिले सांगितले पाहिजे. आपली उंची किती आणि आपण कोणावर बोलतो हे तपासा अशी टीका काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांनी केली आहे.






काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे व सोमेश्वर दिवटे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, नुकतेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संगमनेरचा दौरा केला आणि या दौऱ्यामध्ये त्यांनी स्पष्ट केले की लोकनेते बाळासाहेब थोरात हे आचार विचार पक्षनिष्ठा आणि प्रामाणिकपणा यामुळे राज्याला आदर्शवत नेतृत्व आहे त्यांच्या नेतृत्वाची राज्याला गरज आहे. एका निवडणुकीने मूल्यमापन होत नसते. इतिहासामध्ये ही अनेक पुरुषांना चढउतारांना सामोरे जावे लागले आहे मात्र त्यानंतर येणारा टप्पा मोठा असतो. अनेकांनी पक्ष बदलले मात्र लोकनेते बाळासाहेब थोरात ही काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहेत आणि ही सर्व राज्याला नव्हे तर देशाला माहित आहे.

अशा परिस्थितीमध्ये अहिल्यानगर जिल्ह्यातून अनेकांना काँग्रेस पक्षाने मोठे केले मंत्रीपद दिले. विविध जबाबदाऱ्या दिल्या आणि त्यांनी पक्ष अडचणीत असताना पक्ष सोडला. रणांगणा मधून पळायचे नसते तर लढायचे असते हा महाराष्ट्राचा स्वाभिमानी मंत्र आहे मात्र अनेकांनी रणांगण सोडून सत्ताधाऱ्यांच्या आश्रयाला गेले आहेत.

त्यात संगमनेरचे नवीन लोकप्रतिनिधी हे राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, आणि आता शिवसेना या पक्षाकडून आहे मात्र ते आत्ताही भाजपशी एकनिष्ठ आहेत ते कोणत्या पक्षाचे आहे हे त्यांना माहित नाही पालकमंत्री सांगतील त्यांचे ते काम करतात आणि ते प्रसिद्धीसाठी वक्तव्य करत आहेत.

खरे तर हे त्यांचे वक्तव्य त्यांनी पालकमंत्र्यांना विचारले पाहिजे की जिल्ह्यामध्ये काँग्रेस मध्ये विविध पदे उपभोगून काँग्रेस पक्ष कोणी सोडला याचे सहज उत्तर सर्वसामान्य जनता देईल असे ते म्हणाले पक्षनिष्ठ बाबत नवीन लोकप्रतिनिधीने बोलू नये कारण त्यांनाच त्यांचा पक्ष माहीत नाही अशी टीकाही त्यांनी केली.

तर शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे म्हणाले की, आपली उंची किती आपण बोलतो किती, हे महत्त्वाचे आहे. २०२४ च्या निवडणुकीमध्ये अपघात झाला. पण जनतेला चूक कळाली आहे. भारतीय जनता पक्षाच्या विरोधात संपूर्ण देशांमध्ये मोठी लाट आहे. सर्वसामान्य नागरिक अस्वस्थ आहे पेट्रोल - डिझेलची मोठी भाव वाढ झाली आहे. रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. बेरोजगारी वाढली आहे आणि हे मूलभूत प्रश्न असताना आता जाती - धर्माच्या नावावर तरुणांचे लक्ष वळवले जात आहेत. संगमनेरचे लोकप्रतिनिधी हे एक फोटो काढता तरी चार निवेदन दिल्याच्या बातम्या प्रसिद्ध करतात. मागील दोन वर्षात त्यांचे एक तरी काम दाखवावे असे खुले आवाहन त्यांनी केले.

# भोंदूगिरी विरोधी महिला परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रबोधनपर कार्यक्रमांनी दिला विवेकाचा संदेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीच्या वाढत्या प्रभावाला विरोध करत महिलांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. जागरूकता, विवेक आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारी 'भोंदूगिरी विरोधी महिला परिषद' संगमनेर येथे उत्साहात पार पडली. 'जागृत महिला मंच' आणि 'लोकपंचायत' यांच्या संयुक्त विद्यमाने मातोश्री मंगल कार्यालयात आयोजित या परिषदेला ग्रामीण भागासह शहर परिसरातील महिलांचा मोठा प्रतिसाद लाभला.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी सुनीता फल्ले होत्या. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बुवाबाजी संघर्ष विभागाच्या राज्य सचिव ॲड. रंजना पगार-गवांदे, लोकपंचायत संस्थेचे अध्यक्ष विजय थोरात, सामाजिक कार्यकर्त्या तारा वामन, स्मिता गाडेकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

परिषदेत विविध वक्त्यांनी अंधश्रद्धेमुळे समाजावर होणाऱ्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकत महिलांनी सजग राहण्याचे आवाहन केले. श्यामसुंदर महाराज सोन्नर यांनी संत परंपरेतील विवेकवादी विचार अधोरेखित करत, संतांनी नेहमीच अंधश्रद्धा व कर्मकांडांना विरोध केला असून समाजाला विवेकाचा मार्ग दाखवला आहे, असे सांगितले.

महिला भोंदूबाबांच्या जाळ्यात कशा अडकतात, याबाबत ज्योती जाधव यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. तर पुण्याचे विशाल विमल यांनी 'भोंदूंच्या दुनियेतील जुगाड' या विषयावर बोलताना भोंदूगिरीमागील फसवणुकीचे विविध प्रकार उघड केले.

यावेळी ज्येष्ठ लेखक हिरालाल पगडाल, राष्ट्र सेवा दलाचे माजी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ अवसक, लोकपंचायतचे विश्वस्त सारंग पांडे, जुबेर इनामदार, माजी जिल्हा परिषद सदस्य सीताराम राऊत, छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. परिषदेत ज्येष्ठ पत्रकार सुधीर लंके आणि ॲड. रंजना पगार-गवांदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच लोक कलामंचच्या वतीने तुळशीराम जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित प्रबोधनपर गीते सादर केली. मुलींनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने कार्यक्रमात विशेष रंगत आणत उपस्थितांची मने जिंकली. ही परिषद अंधश्रद्धे विरोधातील केवळ चर्चा न ठरता समाजात विवेक आणि वैज्ञानिक विचार रुजवण्याच्या चळवळीचा प्रभावी संदेश ठरली.

# घुलेवाडीच्या सुपुत्राची ठाणे पोलीस उपायुक्तपदी पदोन्नती

युवावार्ता (प्रतिनिधी)

घुलेवाडी गावासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी म्हणजे गावचे सुपुत्र विवेकजी मारुतीराव पानसरे यांची ठाणे पोलीस उपायुक्तपदी पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण घुलेवाडी गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि शिस्तप्रिय कार्यशैली यांच्या जोरावर विवेक पानसरे यांनी पोलीस खात्यात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत त्यांनी आपल्या उत्कृष्ट सेवेमुळे वरिष्ठांचा विश्वास संपादन केला. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची ठाणे पोलीस उपायुक्तपदी पदोन्नती करण्यात आली आहे. ही बाब घुलेवाडीसह संपूर्ण परिसरासाठी अत्यंत गौरवास्पद मानली जात आहे.

विवेक पानसरे हे घुलेवाडी येथील प्रसिद्ध गुरुकृपा क्लिनिकचे डॉक्टर विक्रम पानसरे यांचे बंधू



आहेत. पानसरे परिवाराने समाजात शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून कायम आपला वेगळा ठसा उमटवला आहे. आता विवेक पानसरे यांच्या या यशामुळे गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

त्यांच्या या पदोन्नतीबद्दल समस्त ग्रामस्थ, मित्र परिवार तसेच विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. आपल्या गावातील युवकांनीही त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. पुढील वाटचालीसाठी त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अधिक यश लाभावे, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून दिल्या जात आहेत.

# कॉकरोच पार्टी हे जनतेच्या मनातील असंतोष - सपकाळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

सातत्याने जनतेचे काम, पक्षनिष्ठा प्रामाणिकपणा, शुद्ध आचार, विचार आणि व्यवहार असणारे राज्याचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या जाणत्या नेतृत्वाची राज्याला गरज असल्याचे प्रतिपादन काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले असून भाजप प्रणित सरकारकडून देशात झालेल्या मोठ्या भ्रष्टाचारामुळे अराजकता वाढीस लागली असून कॉकरोच पार्टी ही असंतोषाचे प्रतीक असल्याचे म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना व अमृत उद्योग समूहाला त्यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी माजी प्रांताध्यक्ष तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य लोकनेते बाळासाहेब थोरात, व्हाईस चेअरमन पांडुरंग पाटील घुले, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, सौ.दुर्गाताई तांबे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, सुधाकर जोशी, के. के. थोरात, विश्वासराव मुर्तडक, रामहरी कातोरे, संपतराव गोडगे, अर्चनाताई बालवडे, निर्मलाताई गुंजाळ, पद्माताई थोरात, प्रमिलाताई अभंग, निखिल पापडेजा यांच्यासह विविध नगरसेवक व अमृत उद्योग समूहातील संस्थांचे पदाधिकारी व काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात हे काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ नेतृत्व आहे. विविध जबाबदारी त्यांनी अत्यंत कार्यक्षमपणे सांभाळली असून त्यांच्या नेतृत्वाची राज्याला गरज आहे. एका निवडणुकीवर मूल्यमापन होत नाही. इतिहासामध्ये अनेक थोर पुरुषांच्या जीवनातही आलेख खालीवर झाला आहे. मात्र येणारा टप्पा यानंतर मोठा असतो. नियतीच्या मनामध्ये नक्कीच काहीतरी चांगले आहे. संगमनेरकरांच्या मनामध्ये जे आहे ते माझ्याही मनात त असल्याचे ते म्हणाले.

कॉकरोच जनता पार्टी हे भारतीय जनतेमध्ये असलेल्या असंतोषाचे प्रतीक आहे. देवाधर्माच्या नावावरून जातीय धुर्विकरण केले जात आहे.









# अहिल्यानगर पोलिस मुख्यालयात भीषण स्फोट

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर पोलिस मुख्यालयात सुरू असलेल्या प्रशिक्षणादरम्यान सोमवारी सकाळी मोठी दुर्घटना घडली. पोलिस कर्मचाऱ्यांना हँडग्रेनेड हाताळण्याचे प्रात्यक्षिक दिले जात असताना अचानक ग्रेनेडचा स्फोट झाला. या भीषण अपघातात चार प्रशिक्षणार्थी पोलिस कर्मचारी जखमी झाले असून त्यापैकी दोघांच्या हाताच्या बोटांना गंभीर दुखापत झाली आहे. सकाळी सुमारे १० वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडल्याने संपूर्ण पोलिस मुख्यालयात एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर नियमित प्रशिक्षण सुरू होते. यावेळी प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांना स्मोक हँडग्रेनेड कसे वापरायचे आणि त्याची हाताळणी कशी करायची, याबाबत मार्गदर्शन केले जात होते. प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सुरू असतानाच अचानक संबंधित ग्रेनेडचा हातातच स्फोट झाला. हा स्फोट इतका जोरदार होता की परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी उपस्थित कर्मचारी आणि अधिकारीही काही काळ गोंधळून गेले.

या दुर्घटनेत शिवराज पवार, शुभम कावरे, गणेश मढे आणि योगेश सोळुंके हे चार प्रशिक्षणार्थी पोलिस कर्मचारी जखमी झाले आहेत. यातील दोन जणांच्या हाताच्या बोटांच्या चिंधड्या उडाल्याची माहिती समोर आली आहे. इतर दोघांना किरकोळ दुखापत झाली असली तरी स्फोटाच्या तीव्रतेमुळे सर्वांनाच मोठा मानसिक धक्का बसला आहे. घटनेनंतर जखमी कर्मचाऱ्यांना तातडीने जवळच्या खासगी रुग्णालयात हलवण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे पोलिस दलात चिंता व्यक्त केली जात असून प्रशिक्षण प्रक्रियेतील सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. घटनास्थळी तपासासाठी विशेष पथकही दाखल झाले आहे. दरम्यान, राखीव पोलिस निरीक्षक उमेश परदेशी यांनी या घटनेबाबत प्राथमिक माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, जमाव नियंत्रणासाठी वापरल्या जाणाऱ्या स्मोक हँडग्रेनेडचे प्रशिक्षण सुरू होते. संबंधित जवानाने ग्रेनेडची पीन काढल्यानंतर लिव्हर हातातून सुटल्याने हा अपघाती स्फोट झाला.

# मुंबई - आग्रा महामार्गावर तिहेरी अपघातात ६ जण ठार, २८ जखमी

धुळे (वृत्तसंस्था)

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील लळिंग घाटात सोमवारी पहाटेच्या सुमारास एक अत्यंत भीषण आणि काळीज हेलावून टाकणारा तिहेरी अपघात झाला. रेतीने भरलेला भरधाव डंपर, एक कार आणि मध्य प्रदेशातून आलेली प्रवासी ट्रॅव्हल्स बस यांच्यात झालेल्या या धडकेत ६ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर २८ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातानंतर घाटात मोठी खळबळ उडाली असून वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, लळिंग घाटातून जात असताना रेतीने भरलेल्या एका डंपरवरील चालकाचे नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्याने हा डंपर थेट रॉंग साइडला गेला आणि समोरून येणाऱ्या एका वाहनाला त्याने जोरदार धडक दिली. या अपघातानंतर घटनास्थळी स्थानिक नागरिक आणि यंत्रणांकडून मदतकार्य सुरू करण्यात आले होते. मात्र, त्याच वेळी मागून आलेल्या मध्य प्रदेशच्या एका भरधाव प्रवासी ट्रॅव्हल्स बसने आधीच अपघातग्रस्त असलेल्या डंपर आणि ट्रकला पाठीमागून भीषण धडक दिली. ही दुसरी धडक इतकी वेगवान होती की ट्रॅव्हल्समधील तीन



प्रवाशांसह एकूण ५ जणांना आपला जीव गमवावा लागला. अपघातानंतर लळिंग घाट परिसरात प्रवाशांच्या किंकाळ्या आणि आक्रोश ऐकू येत होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महामार्ग पोलिस आणि टोल नाक्यावरील मदत पथकाने तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले. वाहनांचे पत्रे कापून जखमींना आणि मृतांना बाहेर काढण्यात आले. सर्व जखमींना तातडीने धुळे येथील शासकीय आणि खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात असून, पोलिस सध्या मृतांची आणि जखमींची ओळख पटवण्याचे काम करत आहेत.

# रयत शिक्षण संस्थेची सुत्रे पुन्हा दळवींच्या हाती

## १०५ वर्षांच्या 'कमवा आणि शिका' परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी

पुणे (वृत्तसंस्था)

आशिया खंडातील सर्वात विस्तारित शैक्षणिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत नारायण दळवी यांची पुनर्निवड झाली. २२ मे रोजी पुणे येथे संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीत सर्व विभागीय पदाधिकाऱ्यांचीही निवड पूर्ण झाली.

सातारा मुख्यालय असलेल्या या संस्थेची मुळे १०५ वर्षांपूर्वी रुजली. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर बहुजन मुलांच्या शिक्षणाचे स्वप्न प्रत्यक्षात आणले. कमवा आणि शिका हे त्यांचे तत्त्वज्ञान आज ७३७ शाखांमधून, महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांसह कर्नाटकापर्यंत पोहोचले आहे. ४२ महाविद्यालये, ४५१ माध्यमिक शाळा, ९१ वसतिगृहे - हा विस्तार केवळ संख्येचा नव्हे, तर पिढ्यानपिढ्या घडवलेल्या स्वप्नांचा आहे.

या संस्थेच्या वाटचालीत अध्यक्षपदावरून अनेक कर्तृत्ववान व्यक्तींनी आपला ठसा उमटवला. कर्मवीर भाऊरावांच्या मूळ विचारांना संघटनात्मक बळ देणाऱ्या पूर्वसुरींच्या परंपरेला पुढे नेत, महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते शरद पवार गेल्या अनेक वर्षांपासून संस्थेचे अध्यक्षपद सांभाळत आहेत. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या दीर्घ अनुभवाचा आणि व्यापक दृष्टिकोनाचा लाभ संस्थेच्या धोरणात्मक वाटचालीला मिळत आला आहे. शैक्षणिक संस्थेला सामाजिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून पाहण्याची भाऊरावांची दृष्टी आणि पवारांचे नेतृत्व यांचा संगम रयतच्या विस्तारात स्पष्टपणे दिसून येतो.

निवड झालेल्या नव्या कार्यकारी रचनेत वाइस चेअरमनपदी ॲड. भगीरथ शिंदे विराजमान झाले आहेत. विभागीय नेतृत्व म्हणून मध्य विभागात संजीव पाटील, दक्षिण विभागात संगीता प्रकाश पाटील, पश्चिम विभागात आमदार चेतन तुपे, उत्तर विभागात आमदार रोहित पवार आणि रायगड विभागात आमदार बाळाराम पाटील यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारे किरण कदू यांचीही या कार्यकारी रचनेत



निवड झाली असून, जिल्ह्यातील शैक्षणिक प्रश्नांवर त्यांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शैक्षणिक प्रशासनाचा कणा म्हणून सहसचिव (उच्च शिक्षण) पदी प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव (माध्यमिक) पदी प्राचार्य बी. एन. पवार, तर ऑडिटर म्हणून प्राचार्य डॉ. राजेंद्र यांची फेरनिवड झाली.

दळवींसारख्या प्रशासकीय अनुभवाची पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीकडे या संस्थेचे नेतृत्व राहणे, हे लाखो विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. उपेक्षित घटकांपर्यंत दर्जेदार शिक्षण पोहोचवण्याचे भाऊरावांचे मिशन आणि आजच्या स्पर्धात्मक शैक्षणिक वातावरणाच्या गरजा - या दोन्हींचा समतोल साधणे, हेच नव्या नेतृत्वापुढील खरे आव्हान आहे. शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने आतापर्यंत हा समतोल यशस्वीपणे जपला आहे; आता दळवींच्या नेतृत्वात तो अधिक दृढ होण्याची अपेक्षा आहे.




दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता









# सूरत-चेन्नई महामार्ग भूसंपादनाचा फेरविचार करा

## आ. अमोल खताळांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या अन्यायकारक नुकसान भरपाईचा फेरविचार करून समृद्धी महामार्गाप्रमाणे वाढीव व न्याय्य मोबदला द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिर्डी येथे भेट घेऊन निवेदनाद्वारे केली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक विचार करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.

तालुक्यातील वडझरी बु., अजमपूर, आरमपूर, चिंचोली गुरव, चिंचपूर खुर्द, हसनाबाद, जुनेगाव, कसारे, लोहारे, सातपूर, तळेगाव, वडझरी खुर्द आदी गावांमधील मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी या महामार्गासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. सन २०२१-२२ मध्ये भूसंपादनाचा निवाडा जाहीर झाला होता. मात्र मंजूर करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, या भागातील बहुतांश जमिनी निळवंडे कालव्याच्या सिंचनाखालील बागायती व अत्यंत सुपीक स्वरूपाच्या आहेत. ऊस, डाळिंब, फळबागा, भाजीपाला तसेच विविध नगदी पिकांमुळे या जमिनींचे उत्पादनमूल्य व बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. स्थानिक व्यवहारांनुसार या जमिनींची किंमत प्रतिएकर सुमारे २५ ते ३० लाख रुपयांपर्यंत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, जाहीर झालेला मोबदला प्रत्यक्ष बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी असून काही ठिकाणी तो प्रतिएकर दहा लाख रुपयांपेक्षाही कमी असल्याचे सांगण्यात आले.

मिरपूर गावातील एका शेतकऱ्याला केवळ २४ गुंठे जमिनीसाठी सुमारे ५ लाख ९ हजार रुपयांचा मोबदला मंजूर झाल्याचे उदाहरण देत, या रकमेवर इतरत्र पर्यायी जमीन खरेदी करणे अशक्य असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन फेरमूल्यांकन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यातील समृद्धी महामार्ग, पालखी मार्ग तसेच इतर ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पांमध्ये अनेक भागांतील शेतकऱ्यांना बाजारभावाच्या अनेकपटीने मोबदला देण्यात आला आहे. काही ठिकाणी कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात आला. मात्र, संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बाबतीत वेगळी भूमिका घेतली जात असल्याची भावना निर्माण झाली असून समान स्वरूपाच्या प्रकल्पांमध्ये अशी तफावत राहणे न्याय व समानतेच्या तत्त्वाला धरून नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भूसंपादनामुळे अनेक शेतकरी कुटुंबांचा उपजीविकेचा मुख्य आधार संपुष्टात येत आहे. भविष्यात या महामार्ग परिसरात औद्योगिक, व्यावसायिक आणि नागरी विकासाला चालना मिळणार असून शासन व संबंधित यंत्रणांना मोठा आर्थिक लाभ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींचे वास्तव मूल्यांकन करून योग्य भरपाई देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच फेअर कम्पेन्सेशन ॲक्ट २०१३ मधील तरतुदीनुसार बाजारभावाच्या चारपटपर्यंत मोबदला देण्याचा विचार शासनाने करावा अशी मागणीही करण्यात आली आहे.

# महागाईचा पुन्हा झटका

## पेट्रोल 112 पार, डिझेलही शंभरीच्या उंबरठ्यावर




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - देशभरात वाढत्या महागाईने सर्वसामान्य नागरिक आधीच त्रस्त असताना आता पुन्हा एकदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीने नागरिकांच्या अडचणीत मोठी भर पडली आहे. नव्या दरवाढीनंतर पेट्रोलचा दर ११२ रुपयांच्या पुढे गेला असून डिझेलही ९९ रुपयांच्या उंबरठ्यावर पोहोचल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी झळ बसणार आहे. सलग चौथ्यांदा झालेल्या या इंधन दरवाढीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी पेट्रोलचा दर १०८ रुपये ८० पैसे इतका होता. त्यामध्ये २ रुपये ७३ पैशांची वाढ करण्यात आल्याने पेट्रोलचा नवा दर आता ११२ रुपये ४३ पैसे इतका झाला आहे. त्याचप्रमाणे डिझेलच्या दरातही २ रुपये ८१ पैशांची वाढ झाली असून पूर्वीचा ९५ रुपये ३२ पैशांचा दर आता ९९ रुपये ०८ पैसे झाला आहे. या दरवाढीचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिक, मध्यमवर्गीय कुटुंबे, शेतकरी, रिक्षाचालक आणि छोटे व्यावसायिक यांना बसण्याची शक्यता आहे. दैनंदिन प्रवासासाठी वाहनांवर अवलंबून असलेल्या नागरिकांचे मासिक बजेट बिघडण्याची भीती निर्माण झाली आहे. आता वाहन चालवणे परवडेनासे झाले आहे, अशा प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

ग्रामीण भागातील शेतकरी वर्गालाही या वाढीचा मोठा आर्थिक फटका बसणार आहे. ट्रॅक्टर, पाणीपंप, मालवाहतूक तसेच शेतीमालाच्या वाहतुकीचा खर्च वाढणार असल्याने शेती उत्पादन खर्च आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि शेतीमालाला योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी संकटात असताना इंधन दरवाढीने त्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. दरम्यान, वाहतूक खर्च वाढल्याने भाजीपाला, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीही वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे आगामी काळात महागाईचा भडका उडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सामाजिक माध्यमांवरही या दरवाढीविरोधात संतप्त प्रतिक्रिया उमटत असून सरकारने इंधनावरील कर कमी करून नागरिकांना तातडीने दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. आता या वाढत्या महागाईवर शासन काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.










संगमनेरचे भुमीपुत्र व महाराष्ट्राचे लोककलावंत कलाभूषण रघवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. या पार्श्वभुमीवर नवीन महाराष्ट्र सदनात रघुवीर खेडकर यांचा पद्म पुरस्कार सोहळ्याच्या पूर्वसंध्येला सन्मान करताना दिल्लीततील मराठी भाषक प्रशासकीय अधिकारी, निवृत्त परराष्ट्रीय सचिव ज्ञानेश्वर मुळे, निवृत्त व्हाईस ॲडमिरल सतीष घोरमाडे, अतिरिक्त सचिव आनंद पाटील, महाराष्ट्र सदन आयुक्त आर. विमला यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सोबत संगमनेरची कन्या प्राची गवांदेसह मयुर आहेर उपस्थित होते.










दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25